# नगरधन किल्ला : एक ऐतिहासकि अवलोकन

डॉ. प्रज्ञा. बी. कामडी
इतिहास विभाग प्रमुख
नगर परिषद शिवाजी महाविद्यालय,
मोवाड – ४४१३०३

सारांश:

*नगरधनला ताम्रपाषाणयुगीन अवशेष सापडल्याची नोंद पुरातत्वांनी केली आहे. साधारणपणे दिडहजार वर्षापुर्वी या नगरास महत्वाचे स्थान होते. नगरधनच्या स्थळाविषयी भिन्न मतप्रवाह दिसून येतात. येथिल किल्ल्याची प्राचीनता थेट वाकाटक काळापासुन पुरातन आहे. आज वाकाटक कालीन किल्ला म्हणुन सिध्द करण्याइतपत त्या काळातील अवशेष शिल्लक राहले नसले तरी कालानुरूप त्यात अनेक बदल झालेले दिसुन येते. नगरधनचा भुईकोट किल्ला आहे. इ.स. २०१२ मध्ये पुरातत्व खात्याने या किल्ल्याची डागडुजी केलेली आहे. त्यामुळे हा किल्ला आता पुन्हा आपले पुर्विचे वैभव दाखवित दिमाखात उभा आहे. प्रस्तूत शोध निबंधात महाराष्ट्र राज्यातील नागपूर जिल्हयातील रामटेक तालूक्यातील नगरधन येथिल ऐतिहासिक किल्ल्याचा अभ्यास केलेला आहे.*

*बिजसंज्ञा: ऐतिहासिक किल्ला, नगरधन, वाकाटक, रामटेक, मेघदूत, नंदीवर्धन.*

प्रस्तावना:

किल्ल्यांना फार मोठा इतिहास लाभलेला आहे येथुनच स्वातंत्र वाटचालीकडे खऱ्या अर्थाने सुरूवात झाल्याचे दिसुन येते. इतिहासात गडकिल्ल्यांचे अनन्य साधारण महत्व आहे. राज्यातील असंख्य किल्ले इतिहासाची साक्ष देत आजही डौलाने उभे आहेत. महाराष्ट्र हा असा प्रदेश आहे ज्या ठिकाणी वेगवेगळया प्रदेशातील परकीयांनी राज्य केले त्यामुळे महाराष्ट्रात बांधण्यात आलेल्या किल्यांमध्ये अफ्रिकन लोकांपासुन ते युरोपियन लोकांपर्यत, दोन हजार वर्षापुर्विच्या सातवाहन राजवंशापासुन ते राष्ट्रकुट चालुक्य शिलाहार यादव, कदंब मराठे, पोर्तुगिज, मोगल, डच, इंग्रज अश्या अनेक वेगवेगळया सत्ताधिशांनी हे किल्ले बांधले आहेत. महाराष्ट्रात जवळपास ३५० हुन अधिक किल्ल्यांची नोंद आहे. एकेकाळी वैभव पाहिलेल्या परंतु आज जिर्णावस्थेत पडुन असलेल्या अनेक किल्ल्यांची उपेक्षा होताना दिसत आहे. पश्चिम महाराष्ट्रात जे स्थान सज्जनगड या किल्ल्यास आहे तेच स्थान विदर्भात नागपूर जिल्हयातील रामटेक जवळील नगरधन या किल्ल्यास आहे. २००० वर्षाचा इतिहास या किल्ल्यास असुन सुप्रसिध्द वाकाटक राजवंशाचा इतिहास या स्थानाभोवती गुंफून पडला आहे. याच गडाच्या दक्षिण पश्चिमेस एक अतिभव्य भुईकोट असुन नगरधन हे त्याचे आजचे नाव परंतु मुळात ही जागा वाकाटकाच्या काळात म्हणजे इ.स. ४ थ्या शतकात नंदीवर्धन या नावाने ओळखली जाई. त्याचेच अपभ्रंशित रूप म्हणजे आजचे नगरधन. हा भुईकोट किल्ला पुण्याच्या शनिवार वाडया इतकाच आकर्षक व प्रशस्त आहे.


नगरधनचा इतिहास:

प्राचीन विदर्भाची राजधानी नंदीवर्धन म्हणजेच आजचे नगरधन होय. नंदीवर्धन ही पुरातण काळात वाकाटकांची समृध्द राजधानी होती. येथे वाकाटक वंशात अनेक राजांनी राज्य केले. वाकाटक राणी प्रभावती गुप्तचा प्राचीन ताम्रपट येथून मिळाला आहे.[१] त्यानंतर तीचा मुलगा द्वितीय प्रवरसेन यांच्या कारकिर्दीत ताम्रपट याच नगरधनातुन दिल्याचा उल्लेख सापडतो. पुढे द्वितीय प्रवरसेनने आपल्या नावे प्रवरपूर (पवनार) नगर स्थापून तेथे आपली राजधानी केली. तरी पण नगरधनचे महत्व कमी झाले नाही. द्वितीय प्रवरसेनचा पुत्र नरेद्रसेन याच्या कारकीर्दीत बस्तर संस्थानातील नलवंशी राजांनी विदर्भावर स्वारी करून त्याचा काही भाग काबीज केला. नंदीवर्धन येथेच त्याने आपली गादी स्थापली. नलवंशी भवदत्त वर्माचा ऋध्दपुर ताम्रपट नंदीवर्धन वरूनच दिला होता. पुढे वाकाटकांनी त्यांना विदर्भातुन हाकलुन लावले. वाकाटकांच्या ऱ्हासानंतर राष्ट्रकुट नृपती स्वामीराज याचा कलचुरी संवत ३२२ (इ.स. ५७३) चा ताम्रपट नंदीवर्धन येथून दिल्याचा उल्लेख सापडतो[२]. त्यानंतर राष्ट्रकुट सम्राट कृष्ण तृतीय याच्या वर्धा

जिल्हयातील देवळी गावी सापडलेल्या ताम्रपटात नंदीवर्धन उल्लेख आहे. भोसलेंच्या काळापर्यत रामटेकपेक्षा नंदीवर्धनला जास्त महत्व होते. दुसरे रघुजी भोसले यांच्या कारकीर्दीत त्यांचे मंत्री देवाजीपंत चोरघडे यांच्या आश्रयास असलेल्या कृष्णदत्त नामक मैथिली पंडिताने पुरंजनचरित हे संस्कुत नाटक लिहिले होते. त्याच्या प्रस्तावनेत नागपूर जवळच्या नंदीवर्धनचा उल्लेख आहे[३].

नगरधनला ताम्रपाषाणयुगीन अवशेष सापडल्याची नोंद पुरातत्वांनी केली आहे. साधारणपणे दिडहजार वर्षापुर्वी या नगरास महत्वाचे स्थान होते. नगरधनच्या स्थळाविषयी भिन्न मतप्रवाह दिसून येतात. येथिल किल्ल्याची प्राचीनता थेट वाकाटक काळापासुन पुरातन आहे. आज वाकाटक कालीन किल्ला म्हणुन सिध्द करण्याइतपत त्या काळातील अवशेष शिल्लक राहले नसले तरी कालानुरूप त्यात अनेक बदल झालेले दिसुन येते. त्याचप्रमाणे जेव्हा वाकाटकांची राजधानी प्रवरपूर (पवनार) येथे स्थलांतरीत करण्यात आली तेव्हा येथिल स्थापत्यकलेकडे दुर्लक्ष होणे साहजिकच आहे. म्हणुनच राष्ट्रकुट काळामध्ये केवळ एक विषय विभागाचे मुख्यालय म्हणुन याविषयाचा उल्लेख मिळतो.

मुळ वाकाटक काळातील किल्ल्यात आता अनेक बदल करण्यात आले आहेत. प्रामुख्याने भोसलेच्या काळात या किल्ल्यात बऱ्याच प्रमाणात नविनीकरण करण्यात आल्याचे दिसते. किल्ल्यांच्या भिंती विटांनी बांधलेल्या आहेत. किल्याच्या प्रवेशद्वारावर गणेशशिल्प मध्य भागात आणि बाजुच्या पट्टीवर शुभचिन्हे, कलश , कमळ आदिंचे अलंकरण आहे. साधारणत: असे चिन्हे मराठा काळात बहुतांशी किल्ल्यांवर दिसते या किल्ल्याच्या बाजुलाच जुना किल्ला म्हणुन जागा दाखवीली जाते. मनसर प्रमाणेच येथे सुध्दा मोठया




आकाराच्या विटा मिळतात. येथूनच राष्ट्रकुट स्वामी राजाचा ताम्रपट प्राप्त झाला आहे.

स्त्रोत:

https://commons.wikimedia.org/wiki/File:Nagardhan_Fort_entrance.jpg½

नगरधनचा भुईकोट किल्ला आहे. इ.स. २०१२ मध्ये पुरातत्व खात्याने या किल्ल्याची डागडुजी केलेली आहे. त्यामुळे हा किल्ला आता पुन्हा आपले पुर्विचे वैभव दाखवित दिमाखात उभा आहे. किल्ल्यातील भुयारी मंदिर हे एक आकर्षण आहे. चंद्रगुप्त विक्रमादित्याने आपली मुलगी प्रभावती गुप्त हिला विदर्भाची जहागीरी दिली होती. या प्रदेशाची व्यवस्था लावण्यासाठी तीच्यासोबत महाकवी कालीदास यांची प्रशासक म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. त्यावेळी त्याचा मुक्काम नगरधन किल्ल्यात होता. याच किल्ल्यातुन दुर दिसणाऱ्या रामटेकच्या डोंगरावर उतरलेल्या पावसाळयाच्या पहील्या मेघाला (आषाढातील) पाहुन कालीदास उज्जैन नगरीच्या आठवनींनी व्याकुळ झाले व त्यांनी मेघदुत हे अजरामर काव्य लिहिले अशी आख्यायीका आहे [४].

भोसलेंच्या काळात नंदीवर्धनास पुन्हा महत्व प्राप्त झाले. आता स्वतंत्र असलेल्या हमलापुरी या स्थानाची नोंद तत्कालीन नंदिवर्धनचाच एक भाग म्हणुन करता येईल. येथे दोन गणांच्या वाकाटक कालीन मुर्ती शेतात सापडल्या यापैकी कुमोदर असलेली बसकी मुर्ती ही देवाच्या बागडणाऱ्या परिचाराची वास्तणकार शिल्पाकुती असून ती यथातथ्य प्रतिनिधीत्व करते तर दुसरा गण राजाप्रमाणे ऐसपैस बसला आहे [५].

## किल्ल्याचे बांधकाम

किल्ल्याचे वैशिष्ट म्हणजे भुईकोट किल्ल्यांना तटाबाहेर अधिक संरक्षणासाठी असलेले वेगवेगळे गोल अष्टकोणी आकाराचे बुरूज पहायला मिळतात. खोल व रूंद चर त्याला खंदक असे संबोधतात. किल्ला संरक्षणात्मकदृष्टया बंदिस्त करण्यासाठी किल्ल्याच्या बाहेरच्या परिघावरउभारलेली भिंत म्हणजे तटबंदी होय आणि तटाच्या भिंती भोवती बांधले जाणारे आणि बाहेरच्या बाजुने पुढे आलेले अर्धगोलाकारकृती किंवा इतर आकाराचे भरीव बांधकाम म्हणजे बुरूज होय. किल्ल्याच्या तटबंदीची उंची ६ जे ८ मिटर असुन त्यावर चर्या आहेत. तटबंदिज जागोजागी जंग्या बनलेल्या आहेत. फांजी ३ जे ४ फुट रूंद असंन त्यावरून

किल्ल्याला आतुन प्रदक्षिणा घालता येते. प्रथमदर्शनी दिसणारे नगरधन किल्ल्याचे उत्तराभिमुख प्रवेशद्वार १२ फुट उंच असंन त्यावर नगरखाना आहे. प्रवेशद्वारातून आत आल्यावर किल्ल्याचे दुसरे प्रवेशद्वार असुन त्यावर द्वारशिल्प कोरलेली आहे. दरवाजाच्या मधोमध गणेशमुर्ती कोरलेली आहे [६]. या प्रवेशद्वारातुन किल्ल्यात प्रवेश केल्यावर डाव्या बाजुला घोडयाच्या पागा आहेत तर उजव्या बाजुला तटबंदीवर जाण्यासाठी छोटा दरवाजा व जिना आहे. जिन्याने वर गेल्यावर फांजीवर एक पीराचे थडगे आहे. येथून



(स्त्रोत: https://commons.wikimedia.org/wiki/File:Nagardhan_Fort.jpg½

पहिल्या प्रवेशद्वारावर असलेल्या नगरखान्यापर्यंत जाता येते. समोर पाण्याच्या थडग्याजवळ भुयार देवीची मुर्तीची स्थापना करून पाण्याच्या स्त्रोताचे पावित्र जपले आहे. या मंदिरात जाण्यासाठी काळोख्या जिन्याने खाली उतरावे लागते. खालच्या भागात उन्हाळयाच्या दिवसात विश्रांती घेण्यासाठी दालन बनविले आहे. जमिनीच्या पोटात व पायाच्या सान्निध्यात हे दालण असल्यामुळे उन्हाळयातही गारवा जाणवतो.

किल्ल्याच्या दक्षिणेकडील भिंतीत तीन कमानी असलेले दालण आहे. या दालणाच्या खाली जमिनीच्या खालच्या पातळीवर चोर दरवाजा आहे. पुढे चौकोणी हौद आहे. या हौदात जमिनिच्या खाली १० फुटांवर एक विहिर खोदलेली आहे. विदर्भातील कडक उन्हाळयात विहिरीचे बाष्पीभवन व्हावे यासाठी ही रचना करण्यात आलेली आहे. विहिरीच्या पुढच्या बाजुस राजवाडा किंवा महालाचा चौथरा आहे. महालात येण्यासाठी असलेला प्रवेशद्वार सध्या उध्वस्त अवस्थेत आहे [७]. यावर नक्षीकामाचा उत्तम नमुना आहे. या महालापासून मुख्य प्रवेशद्वाराकडे आल्यावर आपली गड फेरी पूर्ण होते.

## श्री कोटेश्वर मंदिर

नंदिवर्धन यंथे कोटेश्वर या नावाने ओळखले जाणारे शिवमंदिर आहे. हेमाडपंथी शैलीत बांधलेले हे मंदिर असंन या स्थानाविषयी काही दंत कथा प्रचलित आहे. येथिल शिवलिंगास एक मोठी भेग असुन त्याविषयी एक कथा प्रचलित आहे. या स्थानावर एक गवळीण अत्यंत निष्ठेने शिवआराधना करीत असे त्यामुळे ती विकत असलेल्या दुधाला चांगला भाव मिळत असे. अर्थात तीच्या पतीस तीच्या चारीत्रविष्या संशय निर्माण झाल्यामुळे ती शिवास स्वत:ला पोटात घेण्याविषयी प्रार्थना करते परिणामत: ते शिवलिंग दुभंगले जाऊन ती त्यात सामावली गेली असा या कथेची आशय आहे. [८] दर महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते.

## शंखतिर्थ तलाव

कोटेश्वर महादेव मंदिराच्या बाजुला असलेल्या जलाशयास शंखतीर्थ किंवा शुक्लतिर्थ म्हणुन ओळखतात. वाकाटककालीन शासनातील पृथ्वीसमुद्र ही नोंद या स्थानाची असावी. या तिर्थाचा उल्लेख रामटेक येथिल लक्ष्मण मंदिरात असलेल्या यादवकालीन शिलालेखातही आहे. हिरालाल यांच्या मते, शिलालेखात असलेल्या अन्य एका तिर्थाचा हंसतिर्थ असा उल्लेख आहे, तो जलाशय सुध्दा नगरधन येथिलच असावा.

## निष्कर्ष

आज किल्ल्यांची उपयुक्तता कमी झाली असली तरी त्याचे रक्षण व पर्यटन स्थळाच्या स्वरूपात विकास करून ऐतिहासीक महत्व समाजासमोर मांडता येईल. आज किल्ल्यांना पुरातत्व विभागाकडुन संरक्षण मिळत असले तरी जनतेमध्ये किल्ला रक्षणाची जागृती करणे गरजेचे आहे. दुर्लक्षामुळे ऐतिहासिक किल्ल्यांची झालेली दैनावस्था लक्षात घेता किल्ला स्वच्छता, पुर्नबांधणीकडे काही प्रमाणात लक्ष दिले जात आहे. नगरधनचा किल्ला हा महाराष्ट्र प्राचीन स्मारक आणि पुरातत्व साईट्स अवशेष कायदा नुसार संरक्षित असुनही या ऐतिहासिक किल्ल्याकडे दुर्लक्षच राहले आहे. या वासतुंचे जतन केले तरच पुढील पीढीला आपला गौरवशाली इतिहास पाहता येईल. नगरधन किल्ल्याचे विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या निधितून पुरातत्व विभागातर्फे जीर्णोधाराचे काम पुर्ण करण्यात आले आहे. परंतु पुर्वेकडील काही भागाचे काम निधिअभावी रखडलेले दिसुन येते. बाहेरील

भागाचे सौदर्यकरण, उद्यान तयार करणे याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. हजारे वर्ष होऊन संध्दा नगरधनचा किल्ला इतिहासाची साक्ष देत आजही उभा आहे. परंतु या किल्ल्याला एक उपेक्षित किल्ला म्हटले तर वावगे ठरणारनाही. जवळच असलेल्या रामटेक गड पर्यटन स्थळ घोषित केल्याने लाखोंचा निधी तेथे उपलब्ध होऊन त्या स्थळाचा विकास झालेला दिसुन येतो परंतु त्याच क्षेत्रात असलेल्या या किल्ल्याकडे मात्र दुर्लक्ष झाल्याने शासनाने एक मौलीक ठेवा म्हणुन या किल्ल्याकडे लक्ष पुरविण्याची गरज आहे.

## संदर्भ


१) मिराशी, वा. वि. वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ, नागपूर प्र. ५१, १८५.

२) मिराशी वा. वि. कलचुरी नृपति आणि त्यांचा काळ, नागपूर प्र. १२८, १५६.

३) मिराशी वा. वि. (१९५८). मेघदुतातील रामगीरी अर्थात रामटेक. विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, कं. ११. पृ. २४

४) https://www.loksatta.com/lokprabha/meghdoot-615556/ accessed on 05/02/2020

५) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, नागपूर जिल्हा भाग – २. दर्शनिका विभाग. महाराष्ट्र शासन मुंबई. पृ. २५९ – २६०

६) कित्ता. पृ. २६०

७) कित्ता. पृ. २५९

८) नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर. महाराष्ट्र राज्य मुंबई. १९६६ पृ. ७३२

९)https://commons.wikimedia.org/wiki/File:Nagardhan_Fort_entrance.jpg accessed on 05/02/2020

१०)https://commons.wikimedia.org/wiki/File:Nagardhan_Fort.jpg accessed on 05/02/2020